राखीव आणि संरक्षित वनातील काही गुन्हे  फौजदारी गुन्हे असणार नाहीत .

मित्रांनो,

या पोस्ट सोबत केंद्र सरकारने प्रकाशित केलेल्या दोन अधिसूचना ( पीडीएफ) पोस्ट करीत आहे. या पूर्वी गटावर त्या झळकल्या असतील पण त्यावर चर्चा झाल्याचे आठवत नाही.  कार्यरत वन अधिकाऱ्यांसाठी महत्त्वाच्या असल्याने त्या बद्दल माझे आकलन समोर ठेवत आहे.

केंद्र सरकारने दि.११ ऑगस्ट २०२३ ला विविध कायद्यांतील काही गुन्हे फौजदारी गुन्ह्याच्या वर्गीकरणातून बाहेर काढले व  त्यांना डी क्रमिनलाईझ केले असून त्या अधिनियमाचे शीर्षक "जन विश्वास ॲक्ट २०२३"  आहे. दि.१५ नोव्हेंबर २०२३ पासून हा कायदा अमलात आला आहे.  याच त्या दोन अधिसूचना आहेत.

पहिल्या अधिसूचनेच्या पृष्ठ क्रमांक ७ वर वन अधिनियमातील बदल असून कलम २६ ( राखीव वन) मधील अपप्रवेश, गुरांचा अपप्रवेश , अवैध चराई आणि वृक्षतोड करताना इतर झाडास इजा पोहचविणे तसेच  कलम ३३( संरक्षित वन) मधील आरक्षित वृक्ष किंवा आरक्षित क्षेत्रास आग लावणे, आरक्षित वृक्ष तोडणे , अशा वृक्षांना गुरांकडून इजा होऊ देणे हे अपराध आता न्यायप्रविष्ट करता येणार नाहीत. ते फौजदारी गुन्हे ( क्रिमिनल ऑफिन्स) असणार नाहीत.

राखीव वनातील अपप्रवेश व गुरे चराई प्रकरणात दोषी कडून,वनाला झालेले नुकसान आणि पाचशे रुपयांपर्यंत दंड वसूल करता येईल. वृक्ष तोडतांना इतर वृक्षाला इजा झाल्यास नुकसान भरपाई आणि पाच हजार रुपयांपर्यंत दंड आकारता येईल.

संरक्षित वनात , कलम ३० खाली आरक्षित वन क्षेत्रास आग लागल्यास, आरक्षित वृक्षाला इजा पोचल्यास दोषीकडून नुकसान भरपाई आणि पाच हजार रुपयांपर्यंत दंड वसूल करता येईल.

भा व अ कलम ६८ मध्ये प्राधिकृत केलेला अधिकारी वरील निर्णय करण्यास सक्षम असेल. म्हणजे  सहाय्यक वनसंरक्षक ते मुख्य वनसंरक्षक हे आदेश करू शकतील.  हे गुन्हे डी क्रिमिनलाईझ झाल्याने प्राधिकृत अधिकाऱ्याची जबाबदारी वाढली असून आदेश कारण मिमांसेसह लिहावे लागतील.

भारतीय राज्यघटनेच्या कलम २५४ नुसार लोकसभेने पारित केलेला बदल हा राज्यातील तरतुदीस निरसित करेल.

क्षेत्रीय अधिकाऱ्यास सर्वसाधारण कल्पना येण्यासाठी हा लेख असून अधिसूचना व कायद्याचा अभ्यास करूनच कार्यवाही करणे आवश्यक आहे.